# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे
४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
☎ २५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : jdtepu@pn3.vsnl.net.in


जा.क्र.विकापु/आस्था-2/नियुक्ती/2011/ 6622 दिांक : 14 SEP

प्रति,

प्राचार्य / संस्था प्रमुख,
शासकीय /अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माण व तत्सम पदवी/पदविका संस्था.
पुणे विभाग

**विषय : मागासवर्गीय अनुशेष भरला जाण्याच्या दुष्टीने विशेष मोहिम राबविण्याबाबत.**

संदर्भ : 1. सामान्य प्रशासन शासन निर्णय क्र.बीसीसी-2011/प्र.क्र.86/2011/16-ब दि.2.8.2011
2. मा.संचालक, तंत्रशिक्षण-महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.12(3)आस्था/2011/मा.अनुशेष/शा.2567 दि.8.9.2011

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये गट-अ ते गट-ड या संवर्गातील मागासवर्गीय अनुशेष भरण्याची विशेष मोहिम राबविण्याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. सोबत सदर शासन निर्णयाची प्रत जोडली आहे. संदर्भ क्र.२ अन्वये मा.संचालक-तंत्रशिक्षण यांनी सर्व शासकीय / शासन अनुदानित अशासकीय संस्थांना अनुशेषाची पदे भरण्याबाबत कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

सर्व शासकीय / शासन अनुदानित अशासकीय संस्थांना कळविण्यात येते की,

१. शासकीय संस्थामधील अनुशेषाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही वर्ग-१ व २ च्या बाबतीत मा.संचालक-तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावर तर वर्ग-३ व ४ च्या बाबतीत मा.सहसंचालक-तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या स्तरावर करण्यात येत आहे.

२. शिक्षकीय पदे भरण्याबाबत अशासकीय अनुदानित पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी जाहिरातीस मान्यता, जाहिरात प्रसिध्दी, निवड समिती, मुलाखत, नियुक्त्या व नियुक्तीस मान्यता या बाबतचे प्रस्ताव मा.संचालक, तंत्रशिक्षण-महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करावेत तर पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांनी त्यांचे प्रस्ताव सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना सादर करावेत. पदवी व पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांमधील वर्ग-३ आणि वर्ग-४ ची पदे भरण्याबाबतचे जाहिरातीस मान्यता, जाहिरात प्रसिध्दी, निवड समिती, मुलाखत, नियुक्त्या व नियुक्तीस मान्यता प्रस्ताव सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना सादर करावेत. प्रस्तावासोबत मंजूर, रिक्त व भरलेल्या पदांचा तपशिल दर्शविणारे प्रपत्र व मागासवर्गीय कक्षाकडून तपासून घेतलेली अद्ययावत बिंदू नामावली यांच्या प्रती जोडाव्यात.

( डी.एन.शिंगाडे )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे-16.

सोबत : प्रपत्र-अ आणि प्रपत्र-ब

प्रत : श्री.शिंदे, प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या
दृष्टीने विशेष मोहीम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०२ ऑगस्ट, २०११

वाचा : १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: असंक १०१०/ प्र.क्र.१/२०१०/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक ५.६.२०१०
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०१०/प्र.क्र. ८३/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २९.११.२०१०
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक १३ एप्रिल,२०११
४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०११/प्र.क्र. ११०/११/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ३०.०६.२०११

प्रस्तावना :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : असंक १०१०/ प्र.क्र.१/२०१०/ वित्तीय सुधारणा-१, दिनांक ५.६.२०१० अन्वये शासकीय विभाग/कार्यालये, शासन अनुदानित संस्था इत्यादींमधील गट-क व गट-ड संवर्गातील पदभरतीस दिनांक ५.६.२०१० पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०११/प्र.क्र. ११०/११/वित्तीय सुधारणा-१, दिनांक ३०.०६.२०११ अन्वये निर्बंधाचा कालावधी आणखी एका वर्षासाठी वाढविण्यात आला आहे. दिनांक १४.४.२०११ पासून मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : बीसीसी २०११/प्र. क्र. ८६ /२०११/१६-ब, दिनांक १३ एप्रिल, २०११ अन्वये खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत :-

१) गट-अ व गट-ब संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची विशेष मोहीम सुरु करण्यात यावी.
२) गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची पदभरतीची प्रक्रिया सुरु करण्याकरिता वित्त विभागाच्या दिनांक २९.११.२०१० च्या शासन निर्णयाच्या अधीन राहून विशेष मोहीम सुरु करण्यात यावी.

गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या प्रक्रियेस उपरोक्त कार्यपद्धतीनुसार थोडा विलंब लागू शकतो, त्यामुळे याबाबतीत सुधारित आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

गट-क व गट-ड संवर्गातील पदांमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याकरिता शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:पदनि २०१०/प्र.क्र. ८३/२०१०/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २९.११.२०१० अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रधान सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली समितीची मान्यता घेण्याची आवश्यकता रहाणार नाही, म्हणजेच पर्यायाने सदर शासन निर्णयातील परिच्छेद (ब) मध्ये क्रमांक ४ पुढे दर्शविलेली कार्यपद्धती अनुसरण्याची आवश्यकता रहाणार नाही. अनुशेषाची पदे भरण्यासाठी नियमित कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विवरण पत्रात दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक संवर्गातील पदांच्या अनुशेषाची परिगणना करण्यात यावी. गट-अ, गट-ब, गट-क आणि गट-ड च्या पदांमधील सरळसेवा भरती व पदोन्नती यामधील अनुशेष

...विभागीय कार्यालय
पुणे.

मार्च, २०१२ पर्यंत भरण्याची कार्यवाही संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी करावी. याप्रमाणे कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांची राहील.

सदर शासन निर्णय सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावा.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०८०२१९१२२४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
( के. पी. बक्षी )
प्रधान सचिव (सेवा)

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव,
अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
संचालक, समाजकल्याण, पुणे,
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
संचालक, सेवायोजन, मुंबई,

(शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक ०२.०८.२०११ चे सहपत्र.)

## विवरण पत्र -१ (सरळ सेवेकरिता ) (गट- अ, ब, क, ड यातील प्रत्येक संवर्गनिहाय)

संवर्गाचे नांव :-

| | | एकूण | SC | ST | VJ[A] | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | मंजूर पदे | 160 | 21 | 11 | 05 | 04 | 06 | 03 | 03 | 30 | 77 |
| (ब) | भरलेली पदे | 120 | 16 | 08 | 04 | 03 | 04 | 02 | 02 | 23 | 58 |
| (क) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक [एकूण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी ] / १०० | | 14 | 06 | 03 | 03 | 04 | 01 | 01 | 23 | 58 |
| (ड) | अनुशेष (ब) - (क) | XXX | 02 | 02 | 01 | 0 | 0 | 01 | 01 | 0 | XXX |

उदा. :- एकूण मंजूर पदे १६० असतील तर आरक्षणानुसार भरणे आवश्यक असलेली पदे अजा-२१, अज-११, विजाअ-५, भजब-४, भजक-६, भजड-३, विमाप्र-३, इमाव-३०, खुला-७७ अशी रहातील. जर भरलेली एकूण पदे १२० असतील तर एकूण भरलेल्या १२० पदांचे आरक्षण (अजा-१६, अज-८, विजाअ-४, भजब-३, भजक-४, भजड-२, विमाप्र-२, इमाव-२३) व खुला-५८ विचारात घेता, जर समजा विविध आरक्षणातील प्रवर्गाची भरलेली पदे अजा-१४, अज-०६, विजाअ-३, भजब-३, भजक-४, भजड-१, विमाप्र-१, इमाव-२३ याप्रमाणे असतील तर अनुशेष अजा-२, अज-२, विजाअ-१,भजब-०, भजक-०, भजड-१, विमाप्र-१, इमाव-० याप्रमाणे राहील.

## विवरण पत्र - २ (पदोन्नतीकरिता) (गट- अ, ब, क, ड यातील प्रत्येक संवर्गनिहाय)

संवर्गाचे नांव :-

| | | एकूण | SC | ST | VJ[A] | NT-B | NT-C | NT-D | SBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | मंजूर पदे | | | | | | | | | |
| (ब) | भरलेली पदे | | | | | | | | | |
| (क) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक [एकूण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी ] / १०० | | | | | | | | | |
| (ड) | अनुशेष (ब) - (क) | XXX | | | | | | | | XXX |

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - 262 0601, 269 0602, 2641150/51, फॅक्स - 2692102.

तार - EDUTECH E-mail : desk12@dte.org.in Internet :htpp/www.dte.org

क्रमांक :- १२(३)आस्था/२०११/मा.अनुशेष/शा.२५६७

दिनांक :- - 8 सितम्बर SEP 2011

प्रति,

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई / पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती

विषयः- मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने विशेष मोहिम राबविण्याबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दिनांक २ ऑगस्ट २०११

वरील विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी संदर्भांकित शासन निर्णयान्वये मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने विशेष मोहिम राबविण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत. त्यानुषंगाने आपल्या स्तरावर कार्यवाही करुन अनुपालन अहवाल द्यावा. सदरहू शासन निर्णय दिनांक २ ऑगस्ट २०११ शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०११०८०२१९१२४६००१ असा आहे. तरी सदर शासन निर्णय आपण आपल्या अधिपत्याखालील सर्व शासकीय विभाग / कार्यालये, शासन अनुदानित संस्थांना अवगत करुन त्यानुसार कार्यवाही करणे बाबत निर्देश द्यावेत तसेच आपल्या अधिपत्याखालील अनुशेषाची पदे भरण्याबाबत कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करावा.

( डॉ. सु. का. महाजन )

प्र.संचालक

तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे
12 SEP 2011
L979